प्रेसनोट

जा.क्र. ६१३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२४/०९/२०१६

# पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.भंडारा तर्फे गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी—कर्मचाऱ्यांचे सत्कार समारंभ

**भंडारा:—** पोलीस मुख्यालय भंडारा येथील पोलीस बहुददेशिय सभागृह येथे दि. २४/०९/२०१६ रोजी इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मधील गुणवत्ता प्राप्त, राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगीरी करणा—या खेळाडु पोलीस पाल्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार पोलीस कर्मचारी सहकारी पंतसंस्था मर्या.भंडारा तर्फे मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मॅडम यांचे हस्ते करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची सुरवात अध्यक्ष मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मॅडम व उपस्थित मान्यवरांनी व्दिप प्रज्वलित करुन केली. यावेळी कार्यक्रमामध्ये इयत्ता १० वी व १२वी चे एकुण ३१ प्राविण्य प्राप्त विद्यार्थी आणि राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगीरी करणाऱ्या खेळाडु पोलीस पालकांचा शिल्ड, पुष्पगुच्छ व रोख बक्षिस देवुन सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू मॅडम यांनी मुलांच्या कौशल्याचे कौतुक करुन त्यांना त्याच्या यशाबद्दल शुभेच्छा दिल्या व त्यांनी आजपर्यंत जी प्रगती साधली आहे त्यामध्ये सातत्य ठेवले पाहीजे. पोलीस कर्मचा—यानी देखील आपली नौकरी सांभाळुन आपल्या पाल्याना वेळ देवुन त्यांना चांगले मार्गदर्शन करीत आहेत. सर्वच पाल्यानी आपले क्षेत्रात अतुलनीय कामगीरी करून नाव लौंकीक केले आहे.

राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू कु. संचारी सुनिल भोवते (व्हॉलीबॉल) कु. किनीता राजेश वासनिक (बाल बॅडमिन्टन) चि. जितेश सुभाष हलमारे (टेनिक्काईट) हया खेळाडूच्या खेळाचे कौतुक करून त्यांनी त्याचे खेळांचा स्तर उंचावण्याकरीता प्रोत्साहीत केले. सर्वसाधारण वाटणारा विद्यार्थी सुध्दा आयुष्यात चांगली प्रगती करु शकतो. विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रात रुची असेल त्या क्षेत्रामध्येच प्रवेश दयावा असे कार्यक्रमात हजर असलेल्या सर्व पोलीस कर्मचा—यांना मार्गदर्शन केले.

पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था भंडारा चे पदाधिकारी यांनी संस्थेचे कामकाजात उत्कृष्ट नियोजन करून संस्थेमध्ये जास्तीत जास्त गुंतवणुक करण्यासाठी पोलीस कर्मचारी यांना प्रोत्साहीत केले. संस्थेतर्फे सभासदांकरीता विविध नाविन्यपुर्ण योजना राबवुन फारच अल्पावधीमध्ये संस्थेचे आर्थिक स्तर उंचावुन सहकार क्षेत्रामध्ये पोलीस विभागातील नागपुर परीक्षेत्रात नाहीतर महाराष्ट्रात पोलीस पत संस्थेचे नाव उज्वल केले आहे या बाबद संस्थेच्या कार्याचे मा. पोलीस अधीक्षक विनीता साहू यानी कौतुक केले.

सदर कार्यक्रमामध्ये सेवानिवृत्त पोलीस अधीकारी/कर्मचारी स.पो.नि. प्रकाश खोब्रागडे, स.फौ. केशव शहारे, स.फौ. नरेंद्र शास्त्री, स.फौ. जिवतुजी पडोळे, तसेच सफाई कामगार सौ. प्रेमवती मलीक यांना पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देवुन पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. धात्रक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला राखीव फौजदार श्री. प्रधान, पोलीस पतसंस्थेचे अध्यक्ष अरुण झंझाड, उपाध्यक्ष अशोक लुलेकर, सचिव ज्ञानेश्वर खोब्रागडे, सर्व सदस्य इत्यादी मान्यवर अधिकारी, पोलीस कर्मचारी व गुणवंत्त मुले—मुली व त्याचे आई वडील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे संचालिका म.पो.शि. योगिनी नाकतोडे व आभार प्रदर्शन संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. राजेश कळंबे यांनी केले.

(व्हि.एस. रहांगडाले )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९०१११७०६००

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.